**नि. फौ. खटला क्र.८६/२०१८**

**निशाणी क्र.३८**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०५ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करते की,**

**माझे नांव** : हारुबाई बाबुराव सोनकांबळे,

**वय** : ६० वर्षे, **धंदा** : घरकाम,

**राहणार** : जवळगा, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखते. त्यापैकी किसन हा न्यायालयामध्ये हजर आहे आणि विजयप्रकाश आणि सुनिता हे गैरहजर आहेत. (अर्ज निशाणी ३६ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.१ आणि ३ च्या ओळखीचा वाद नसल्याने त्यांची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दोन–चार वर्षापूर्वी सायंकाळी ४.०० वाजता शेतात घटना घडली होती. तिन्ही आरोपींनी मला, बाबू सोनकांबळे व विलास सोनकांबळे यांना काठ्यांनी मारहाण केली होती. माझ्या डोक्यावर आणि पायावर दुखापत झाली होती. बाबू सोनकांबळे यांचा हात मोडला होता. आता मला वस्तूचिन्ह अ वरील काठी दाखविली. ही सदर मारहाणीमधील काठी नाही. त्यानंतर आम्ही दवाखान्यात गेलो. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपीकरिता विधीज्ञ उलटतपास श्री. एम.एस. नागराळे यांच्यामार्फत ::**

०२. माझे शिक्षण झालेले नाही. मला लिहिता व वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी काय जबाब लिहीले हे मला माहीत नाही. पोलिसांनी मला जबाब वाचून दाखविला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आमचा आरोपींसोबत शेताचा वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती आणि मुलाने आरोपी किसन आणि विजयप्रकाश यांना मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती आणि मुलाविरुध्द फौजदारी केस दाखल झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसची माहिती झाल्यानंतर आम्ही

प्रस्तुत केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला आरोपींनी कसलीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी घरात पडली होती व त्यामुळे मला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती बाबू यांनी सांगितल्याप्रमाणे मी साक्ष दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगितल्याप्रमाणे घटना घडली नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.२२/१२/२०२५.